# T14/AGR218/EE/20160306

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप–प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप–प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप–प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कृषि सेवा केंद्र उभारणीसाठी जागेची निवड करताना कोणते मुद्दे विचारात घ्यावे लागतात? ते लिहा. 5

ब) पिकांच्या संकरित अथवा सुधारित वाण निर्माण करणाऱ्या महाराष्ट्रातील संस्थांची माहिती सविस्तर लिहा. 5

क) किडनियंत्रणाच्या कोणत्या पद्धती प्रचलित आहेत? त्यापैकी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीविषयी माहिती लिहा. 5

ड) कृषिविषयी ज्ञान देणाऱ्या कोणकोणत्या संस्था आहेत? त्यांच्याविषयी थोडक्यात लिहा. 5

इ) कृषि सेवा केंद्र स्थापन करण्यासाठी कोणकोणते परवाने लागतात तसेच शासनाच्या अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्या प्रकारच्या शिक्षा होऊ शकतात ते लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कृषि सेवा केंद्र स्थापनासाठी व चालविण्यासाठी आर्थिक नियोजन कसे कराल याविषयी आपले मत मांडा. 5

ब) बी–बियाणे व नर्सरी रोपांचे वेगवेगळे कोणते प्रकार पडतात ते लिहून त्यांचे तुलनात्मक फायदे व तोटे कोणते ते स्पष्ट करा. 5

क) शेतीमध्ये यंत्र व साहित्याचा वापर केल्यास कोणते फायदे होतात ते लिहा. 5

ड) महाराष्ट्रातील बागायती शेतीची थोडक्यात माहिती लिहून ठिबक सिंचन कसे उपयुक्त आहे ते स्पष्ट करा. 5

इ) शेतीचे यांत्रिकीकरण म्हणजे काय? शेती व्यवसायामध्ये पशुबळापेक्षा यांत्रिक बळ कशा प्रकारे किफायतशीर आहे ते लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) निविष्ठांची विक्री रोखीने अथवा उधारीने करणे हे व्यवस्थापकाचे कौशल्य आहे. कसे ते स्पष्ट करा. 5

ब) कृषि सेवा केंद्र व्यवस्थापक व शेतकरी यांचे संबंध कशा स्वरूपाचे असावेत याबद्दल थोडक्यात आपले मत व्यक्त करा. 5

क) कॅश क्रेडिट म्हणजे काय? शेती व्यवसायामध्ये त्याचे महत्त्व विशद करा. 5

ड) निविष्ठा विक्रीपासून व्यवस्थापकाने किती फायदा अपेक्षित करावा? थोडक्यात विश्लेषण करा. 5

इ) व्यवस्थापनातील दूरदर्शीपणा म्हणजे काय? तो कशा प्रकारे अवगत होऊ शकतो ते स्पष्ट करा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) शेती व्यवसायासाठी शासनाच्या विविध योजना थोडक्यात स्पष्ट करा. 5

ब) सहकारी पतपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना (पिरॅमिडसारखी) आकृतीसह स्पष्ट करा. 5

क) आधुनिक पिक पद्धतीमध्ये पिकांचे नियोजन कशा प्रकारे केले जाते? ते सविस्तर लिहा. 5

ड) पिकांना विविध निविष्ठा वापरण्यासंबंधीचे अज्ञान शेतकऱ्यांमध्ये अद्यापही आहे याविषयी सविस्तर माहिती लिहा. 5

इ) प्रतवारी म्हणजे काय? प्रतवारीचे फायदे थोडक्यात लिहा. 5